# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad
## Date – 02 March 2021
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी औरंगाबाद
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक २ मार्च २०२१ सायंकाळी ६.१०

****

** राज्यपालांच्या अभिभाषणावर आभार प्रस्तावाच्या चर्चेला आज विधानसभेत सुरवात; सरकार फेसबुक लाईव्हमध्ये मग्न असल्याची देवेंद्र फडणवीस यांची टीका

** कृषीपंप आणि वीज ग्राहकांच्या थकबाकीसंदर्भात विधीमंडळात निर्णय होईपर्यंत वीज जोडणी कापू नये - उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश

**आणि**

** लातूर जिल्ह्यातल्या शहरी भागात आजपासून रात्रीची संचारबंदी; सिद्धेश्वर आणि रत्नेश्वर महाशिवरात्री यात्रा रद्द

****

राज्यपालांच्या अभिभाषणावर आभार प्रस्तावाच्या चर्चेला आज विधानसभेत सुरवात झाली. शिवसेनेचे सुनील प्रभू यांनी चर्चेला सुरवात करत, कोविड पार्श्वभूमीवर राज्य सरकारनं अभिमानास्पद कामगिरी केल्याचं मत व्यक्त केलं. सीमावासीयांवर सातत्यानं अन्याय होत असल्यामुळे हा भाग केंद्रशासित करावा, अशी मागणी त्यांनी केली,

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी या चर्चेत सहभागी होत, हे सरकार संवेदनशील नाही, अशी टीका केली. राज्य सरकारचा 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' ते 'मी जबाबदार' हा प्रवास आरोग्य व्यवस्थेची थट्टा असून, सरकार फेसबुक लाईव्हमध्ये मग्न असल्याची टीका फडणवीस यांनी केली. शिक्षणक्षेत्रात सरकारचा वाढता हस्तक्षेप, पूजा चव्हाण मृत्यूप्रकरण, कोविड प्रतिबंधक टूल किट आणि धानखरेदीत घोटाळा झाल्याचा आरोप करत राज्यात

कायदा आणि सुव्यवस्था कोलमडली असल्याचं फडणवीस म्हणाले. महाराष्ट्रात कोविडचा प्रभाव एवढा का वाढतो आहे, असा सवालही फडणवीस यांनी केला.

****

कृषीपंप आणि वीज ग्राहकांच्या थकबाकीसंदर्भात विधीमंडळात निर्णय होईपर्यंत कुणाचीही वीज जोडणी कापू नये, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. ते आज विधानसभेत बोलत होते. विधीमंडळ अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी आज विधानसभेत प्रश्नोत्तराचा तास स्थगित करून विजेच्या मुद्यावर चर्चा घेण्याची मागणी विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केली. त्यावर वीज थकबाकी संदर्भात विशेष बैठक घेत चर्चा करण्याची सरकारची तयारी असल्याचं उपमुख्यमंत्र्यांनी सांगितलं. वीज जोडणी खंडीत करण्याच्या मोहिमेला स्थगिती दिल्याबद्दल फडणवीस यांनी उपमुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

*****

राज्यात ज्या पोलिस ठाण्याच्या हद्दीत हुक्का पार्लर सुरू असेल तिथल्या संबंधित पोलिस अधिकाऱ्याला जबाबदार धरून त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असा इशारा गृहमंत्री अनिल देशमुख यांनी दिला आहे. विधान परिषदेचे सदस्य रवींद्र फाटक तसंच महादेव जानकर यांनी प्रश्नोत्तराच्या तासात विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. राज्यातील फळबाग लागवडीसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही अशी ग्वाही कृषी मंत्री दादा भुसे यांनी विधान परिषदेत दिली. सदस्य प्रसाद लाड यांनी प्रश्नोत्तराच्या तासात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत २१७ कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असून त्यापैकी १०३ कोटी रुपये वितरित करण्यात आल्याची माहिती भुसे यांनी दिली.

****

कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाच्या दुसऱ्या टप्प्यात नागरिकांकडून पैसे आकारण्याच्या सरकारच्या निर्णयावर माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. लसीकरणाच्या दुसऱ्या टप्प्यात ४५ वर्षांवरचे सहव्याधी असलेले रुग्ण तसंच ६० वर्षापेक्षा जास्त वय असणाऱ्या व्यक्तींना सरकारी रुग्णालयात ही लस मोफत मिळणार असून, खासगी रुग्णालयात लसीची किंमत २५० रुपये प्रति डोस द्यावी लागणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणानुसार लसीकरण मोहिमेसाठी ३५

हजार कोटी रुपये राखून ठेवले आहेत. एवढ्या रकमेमध्ये दीड अब्जाहून अधिक डोस विकत घेता येतील, आणि ७५ कोटी लोकसंख्येचं म्हणजेच भारतातील संपूर्ण प्रौढ लोकसंख्येचे लसीकरण करता येणं शक्य आहे. असं असताना केंद्र सरकार सर्वसामान्यांकडून शुल्क का घेत आहे?, असा प्रश्न चव्हाण यांनी विचारला आहे.

*****

मुंबई काळोखात बुडाल्या प्रकरणी स्वत:चे अपयश झाकण्यासाठी महाविकास आघाडी सरकार चीनच्या सायबर हल्ल्याच्या कपोलकल्पित बातम्या पसरवत असल्याचा आरोप राज्याचे माजी ऊर्जामंत्री आणि भाजपा प्रदेश सरचिटणीस चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. ते आज नागपूर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. १२ ऑक्टोबर २०२० रोजी घडलेली ही घटना, ऊर्जाखात्यातील अधिकाऱ्यांचं दुर्लक्ष आणि समन्वयाच्या अभावातून झाल्याचा दावा बावनकुळे यांनी केला. या घटनेत परराष्ट्राचा संबंध असेल तर राज्याने हा विषय केंद्र सरकार समोर का मांडला नाही? परराष्ट्र खाते आणि संरक्षण खात्यासमोर हा विषय मांडणे राज्य सरकारला महत्त्वाचे वाटले नाही का, असं बावनकुळे म्हणाले.

*****

राज्यसभा आणि लोकसभा दूरचित्रवाणी वाहिन्यांचं विलीनीकरण केलं जाणार असून, नवीन वाहिनीला 'संसद टीव्ही' असे नाव देण्यात आलं आहे. माजी प्रशासकीय अधिकारी रवी कूपर यांना संसद टीव्हीचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नेमण्यात आलं आहे. राज्यसभा आणि लोकसभा वाहिन्यांचे कार्यक्रम आणि विविध विषयांवर असलेल्या अभ्यासपूर्ण सादरीकरणाला नागरिकांचा गेल्या काही वर्षांपासून विशेषतः सामाजिक माध्यमांवर मोठा प्रतिसाद लाभतो आहे.

****

औरंगाबाद इथल्या शासकीय वैद्यकीय रुग्णालयात आज २९ नवीन कोविड बाधित रुग्ण दाखल झाले.त्यामुळे जिल्ह्यातल्या एकूण कोविड बाधितांची संख्या ५० हजार ६२० झाली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत ४७ हजार १३७ रुग्ण बरे झाले असून एक हजार २७१ जणांचा मृत्यू झाला आहे.

****

लातूर जिल्ह्यात लातूर शहर महानगरपालिकेसह, औसा, निलंगा, उदगीर आणि अहमदपूर नगर परिषद क्षेत्रात आजपासून रात्री ११ ते पहाटे ५ वाजेपर्यंत संचारबंदी लागू करण्यात येत

आहे. जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी पी यांनी याबाबत आदेश जारी केला आहे. या आदेशातून अत्यावश्यक सेवांना वगळण्यात आलं आहे. सार्वजनिक वाहतुक, औषधी दुकानं, रुग्णालयं यांना आदेश लागू राहणार नाही, असं या आदेशात म्हटलं आहे. दरम्यान, यंदा कोविड प्रादुर्भावामुळे लातूरचं ग्रामदैवत सिद्धेश्वर आणि रत्नेश्वर देवस्थानची महाशिवरात्री यात्रा पूर्णतः रद्द करण्यात आली आहे. देवस्थानच्या प्रशासक तथा धर्मादाय उपायुक्त यू.एस.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. महाशिवरात्रीनिमित्त ठराविक मंडळींच्या उपस्थितीत विधिवत पूजाअर्चा मात्र होणार आहेत. शिवरात्रीच्या दिवशी रात्री गवळी समाजाच्या वतीने केला जाणारा दुग्धाभिषेक तसंच माळी समाजाचा पुष्पाभिषेक फक्त पाच जणांच्या उपस्थितीत होईल. दरवर्षी गौरीशंकर मंदिरापासून काढण्यात येणारी मानाच्या काठ्यांची मिरवणूक यावर्षी रद्द करण्यात आली आहे. त्याऐवजी दोन मानकऱ्यांच्या हस्ते या काठ्यांचे गाभाऱ्यातच पूजन होईल. यात्रा कालावधीत केले जाणारे भजन-कीर्तन तसंच काकडा फक्त ११ लोकांच्या उपस्थितीत केला जाईल. शिवरात्री निमित्त भाविकांसाठी दर्शन पूर्णपणे बंद ठेवण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला.

****

औरंगाबाद-अहमदनगर या १२० किलोमीटर अंतराच्या प्रस्तावित रेल्वे मार्गाच्या प्रत्यक्ष सर्वेक्षणाला सुरुवात झाली आहे. या अंतरात पर्यटन स्थळं, व्यापारी पेठा तसंच महत्त्वाच्या बाजारपेठा किती आहेत, औरंगाबाद पुणे-नगर साठी बसवाहतुकीतून किती उत्पन्न मिळतं, या मार्गावर मालवाहतुक किती आहे, या बाबी तपासल्या जाणार आहेत. या रेल्वे मार्गामुळे औरंगाबाद रेल्वेने थेट पुण्याशी जोडलं जाणार असून, हा मार्ग अधिक सोयीचा ठरणार असल्याचं म्हटलं जात आहे.

****

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३० साली नाशिक इथल्या काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह केला. दरवर्षी २ मार्च रोजी या सत्याग्रहाचं स्मरण करून अभिवादन केलं जातं. आजही या मंदिरात दिवसभर विविध कार्यक्रम झाले. कोविड प्रादुर्भावामुळे छोट्या स्वरूपात आणि आरोग्य नियमांचे पालन करून झालेल्या या कार्यक्रमांना विविध क्षेत्रातील मान्यवरांनी हजेरी लावली.

****

कॅनकिड्स किड्सकॅन या स्वयंसेवी संस्थेच्या बाल कर्करोगविरोधी जनजागृती अभियानात राज्य परिवहन महामंडळ सहभागी झालं आहे. कॅनकिड्स किड्सकॅन ही संस्था संपूर्ण देशभरात बाल कर्करोगविरोधी जनजागृतीचे कार्य करते. या संस्थेचे बाल कर्करोगविरोधी जनजागृतीचे फलक  एसटी बसेसवर निःशुल्क लावण्यात आले आहेत. सकारात्मक सामाजिक बदलांमध्ये एसटी  महामंडळ कृतिशील सहभाग नोंदवत आहे.

****

नाशिक शहरात कॉलेजरोड भागात आज दुपारी एक बॉम्ब सदृश्य वस्तू आढळल्याने खळबळ उडाली. बॉम्ब शोधक आणि नाशक पथकाने ही वस्तू म्हणजे एक फटाक्याचा प्रकार असल्याचं सांगत, निकामी केली. प्लास्टिकच्या एका लहान चेंडूत भरलेली फटाक्याची दारू आणि त्याला लावलेली वात, असं या स्फोटक सदृश्य वस्तूचं स्वरूप होतं. पोलीस उपायुक्त अमोल तांबे यांनी ही माहिती दिली. या वस्तू मध्ये कुठल्याही प्रकारचे धातू मिश्रित घटक नसल्याचा खुलासा बॉम्ब शोधक आणि नाशक पथकाने केला आहे.

****

औरंगाबाद जिल्ह्यातल्या पिशोर पोलिस ठाण्याचा उपनिरीक्षक रणजीत कासले याला वीस हजार रुपायांच्या लाचेची मागणी केल्याचं सिद्ध झाल्यानं लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं अटक केली आहे. पोस्को कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्यात आरोपीला मदत करण्यासाठी कासले यानं ही लाच मागितली होती.

//***************//